नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४००० ०२१.
दूरध्वनी : ०२२-२२०४४९५२/२२०४५७०६ फॅक्स: २२८८६६६६
ई-मेल: clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in ;
dclmms_complaints@yahoo.com

क्र. वैमाशा-१०/शासन शुल्क/परिपत्रक/२०१४ / ८३४५ दिनांक-२५ नोव्हेंबर, २०१४

# परिपत्रक

**विषय:- वैध मापन शास्त्र अधिनियम / नियम यामधील तरतुदीनुसार स्विकारण्यात येणा-या शुल्कांच्या कार्यप्रणालीबाबत.**

वैध मापन शास्त्र यंत्रणेमार्फत प्रामुख्याने खालील वेगवेगळे शुल्क स्विकारण्यात येते.

1. वैध मापन शास्त्र अधिनियम, 2009, वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, 2011 व महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, 2011 अंतर्गत प्रशमन शुल्क.
2. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, 2011 अंतर्गत प्रतिभुती ठेव.
3. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, 2011 मधील नियम 6(5) व 6(6) अंतर्गत परवाना शुल्क, परवाना नुतणीकरण शुल्क, परवाना नुतणीकरण विलंब शुल्क, परवान्यामधील फेरफार अथवा त्याची दुसरी प्रत देण्याबाबतचे शुल्क.
4. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, 2011 मधील नियम, 14(4) अंतर्गत पडताळणी प्रमाणपत्राच्या नक्कल प्रतीसाठीचे शुल्क.
5. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, 2011 मधील नियम 15 अंतर्गत पडताळणी मुद्रांकन शुल्क, फेरपडताळणी मुद्रांकन शुल्क व तदनुषंगिक अन्य शुल्क.
6. वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, 2011 मधील नियम 19(4) अंतर्गत आवेष्टीत वस्तूंचे उत्पादन / आवेष्टन यांच्या आस्थापनेच्या ठिकाणी करावयाच्या फेरतपासणीसाठीचे शुल्क.
7. वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, 2011 मधील नियम 27 अंतर्गत नोंदणी शुल्क व नोंदणीमधील फेरफार करण्याबाबतचे शुल्क.

महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, 2011 मधील नियम 16 अन्वये पडताळणी व मुद्रांकन फी वसूल करणे व कोषागारात जमा करणे याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांना आहेत. या तरतुदीनुसार सर्व अधिकारी व कर्मचारी यांना पुढील आदेश देण्यात येत आहेत.

यंत्रणेकडे जमा होणारे शुल्क हे खाली नमुद केलेल्या पर्यायांपैकी कोणत्याही स्वरुपात स्विकारण्यात यावेत.

1. रु.300/- च्या कमाल मर्यादेपर्यंत रोखीने.
2. भारतीय रिझर्व बँकेचे चलन
3. कोषागार चलन
4. राष्ट्रीयकृत बँकेचे धनादेश / धनाकर्ष
5. भारतीय रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या इतर बँकांचे धनादेश / धनाकर्ष.
6. डिमांड ड्राफ्ट
7. पे ऑर्डर
8. इंडियन पोस्टल ऑर्डर
9. ग्रास (Govt. Receipt Accounts System) लागू असेल तेव्हा.

धनादेश हे स्थानिक क्षेत्रातील बँकेचेच असणे आवश्यक आहे. धनादेश, डिमांड ड्राफ्ट व पे - ऑर्डर या स्वरुपात शुल्क स्विकारल्यानंतर, महाराष्ट्र कोषागार नियमात नमुद केलेल्या नमुन्यात पावती देण्यात यावी. इंडियन पोस्टल ऑर्डरचे स्थळप्रतीवर पोच देण्यात यावी. **धनादेश वटवल्यानंतरच पडताळणी व मुद्रांकनाचे काम करण्यात यावे.**

शासन आदेशाप्रमाणे रु.300/- पेक्षा कमी रक्कम रोख स्वरुपात स्विकारणे सर्व शासकीय कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 व मुंबई वित्तीय नियम, 1959 मधील तरतुदींप्रमाणे फक्त रु.300/- (रुपये तीनशे) पेक्षा कमी रक्कम रोख स्वरुपात स्विकारण्यास परवानगी देण्यात येत आहे.

वैध मापन शास्त्र अधिकारी हे फक्त वजनमाप उपयोगकर्ता वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी, प्रशमन झालेल्या प्रकरणातील अपराधी व्यक्ति वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांच्याकडूनच शासकीय शुल्क स्विकारतील. प्राधिकृत प्रतिनिधीमध्ये कोणत्याही परवानाधारकांचा (उत्पादक, दुरुस्तक, विक्रेता इ.) अंतर्भाव होणार नाही. एकच व्यक्ति एकापेक्षा जास्त वजनमाप उपयोगकर्त्याचा वा प्रशमन झालेल्या प्रकरणातील अपराधी व्यक्तिचा प्राधिकृत प्रतिनिधी होवू शकत नाही.

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति:- उप नियंत्रक, वै.मा.शा. सर्व विभाग